प्रकाशीत करावयाच्या 1 ते 17 बाबी

कलम 4 (1) (ब) (i)

पंचायत समिती नेर या कार्यालयातील कार्य व कर्तव्ये यांचा तपशील

1.**कार्यालयाचे नांव**:- पंचायत समिती, **नेर**

2. **पत्ता** :- तहसिल कार्यालयाजवळ, अमरावती रोड जिल्हा यवतमाळ

3. **कार्यालय प्रमुख** :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती नेर

4. **विभागाचे नांव** :- पंचायत समिती नेर

5. **कोणत्या मंत्रालयातील खात्याच्या अधिनस्त** :- ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय , मुंबई - 400032

6. **कार्यक्षेत्र कळंब तालुका** :- **भौगोलिक** क्षेत्रफळ कार्यानुरुप सर्व ग्रामीण विभाग

7. **विशिष्ट कार्ये** :- १. केंद्र शासन / राज्य शासन / जिल्हा परिषदेकडुन नेमुन दिलेल्या शासकीय योजनांची अंमलबजावणी करणे.

२. वर्ग 3 व वर्ग 4 च्या कर्मचा-यांच्या आस्थापणा विषयक सर्व बाबी अद्यावत ठेवणे . तसेच त्यांची सेवा निवृत्ती प्रकरणे मंजुरीकरीत विभागीय कार्यालयास सादर करणे.

३.खाते चौकशी प्रकरणात 1 ते 4 जोडपत्रामध्ये प्रस्ताव तयार करुन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.यवतमाळ यांचेकडे सादर करणे.

४.कर्मचा-यांच्या पगार व इतर भत्ते सेदर्भात अंदाजपत्रक तयार करुन ते संबंधीत खातेप्रमुखास सादर करणे व अनुदानावर नियंत्रण ठेवणे. जेनेकरुन अनुदानापेक्षा जादा खर्च होणार नाही.

५.पंचायत समितीची मासीक सभा घेणे.

8. **विभागाचे ध्येय व धोरण** :- शासनाच्या विविध योजनांची ग्राम पंचायत स्तरावर अमलबजावणी करणे. कार्यक्षेत्रातील जनतेच्या समस्या विहीत कालावधीत सोडविणे व कार्यालयीन कामकाजात पुर्णपणे पारदर्शकता ठेवणे.

9. **सर्व संबंधीत कर्मचारी** :- सहायक प्रशासन अधिकारी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, सहायक लेखा अधिकारी, कनिष्ठ लेखा अधिकारी, शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता,कृषि अधिकारी सामान्य व वि.घ.यो., विस्तार अधिकारी (पंचायत), विस्तार अधिकारी (कृषि), विस्तार अधिकारी (सांखिकी) विस्तार अधिकारी (शिक्षण),आरोग्य पर्यवेक्षक, आरोग्य सेवक, वरीष्ठ सहायक,स्थांपत्य अभियांत्रीकी सहायक,गट समन्वयक (पाणी व स्वच्छता),समुह समन्वयक(पाणी व स्वच्छता),सहायक कार्यक्रम अधिकारी, (नरेगा), तांत्रिक सहायक कृषि व स्थापंत्य (नरेगा),डाटा ऐन्टी ऑपरेटर (नरेगा), तालुका व्यवस्थापक (राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान) वाहन चालक व परीचर

10.**कार्य** :- १.केंद्र शासन / राज्य शासन / जिल्हा परिषदेकडुन नेमुन दिलेल्या योजनांची अंमलबजावणी करणे.

२.वर्ग 3 व वर्ग 4 च्या कर्मचा-यांच्या आस्थापणा विषयक सर्व बाबी.

11. **कामाचे विस्तृत स्वरुप** :- पंचायत समितीची मासीक सभा घेणे,पंचायत समिती स्तरावरील पंचायत विभाग,शिक्षण विभाग,आरोग्य विभाग,बांधकाम विभाग, कृषी विभाग,पशु संवर्धन विभाग या विभागावर नियंत्रण ठेवणे.

12. **इमारती व मालमत्तेचा व जागेचा तपशिल** :- पुरेशी शासकीय जागा व स्वतंत्र इमारत आहे.

13. **उपलब्ध सेवा** :- दूरध्वनी व ई - मेल सेवा कार्यान्वीत आहे.

14. **कार्यालयातील दुरध्वनी क्रमांक व वेळ** :- ०७२३८- २६७७३८ वेळा :- ९.४५ ते ६.१५

15. **सप्ताहिक सुट्टी व विशिष्ट सेवेसाठी ठरविलेल्या वेळ** :- महिन्यातील सर्व शनिवार व रविवार. त्याशिवाय शासनाने ठरवुन दिलेल्या सुट्ट्या व मा.जिल्हाधिकारी यांनी ठरवुन दिलेल्या वर्षातील ३ सुटट्या राहतील.

कार्यालयीन वेळ

वर्ग ३ –सकाळी ०९.४५ते सायं. ०६.१५ पर्यंत.

वर्ग ४ - सकाळी ०९.३० ते सायं. ०६.३० पर्यंत.

२- कलम ४ (१) (ब) (ii)

नमुना (ब)

पंचायत समीती नेर येथील कार्यालयातील अधिकारी कर्मचारी यांचे कर्तव्याचा तपशील.

अ.क्र	पदनाम	कर्तव्य	कोणत्या कायदा,नियम, शासननिर्णय, परिपत्रकानुसार	अभिप्राय
१	गट विकास अधिकारी	अधिकार – आर्थीक १.रु.५००० /- पर्यत कार्यालयीन कामा करीता अग्रीम मंजुर करणे २. रु.१०,००,००० /- पर्यतच्या निविदा स्विकृतीचे प्रशासकीय मंजुरी देणे ३.कर्मचा-यांना भविष्य निर्वाह निधी मधुन परतावा अग्रीमास मंजुरी देणे व पं.स.अंतर्गत असलेल्या सर्व कर्मचा-यांचे रक्कमेचे आहरण व संवितरण करणे	शासन निर्णय क्रमांक झेडपीए २०१६ / प्र.क्र.५६/वित्त ९ दि. ७ ऑक्टोबर २०१७ भाग १ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. शुध्दीपत्रक क्रमांक झेडपीए २०१६ / प्र.क्र.५६/ वित्त ९ दि.०६ सप्टेंबर २०२१ अन्वये विकास योजना यांचेशी सबंधित प्रशासकीय व तांत्रिक मान्यता अधिकारात वाढ करण्याबाबत	
२	---,,---	अधिकार – प्रशासकीय १.पं.स. अंतर्गत असलेलया सर्व वर्ग-३ व वर्ग-४ कर्मचा-यावर प्रशाकीय नियंत्रण ठेवणे, २.कर्मचा-याचे स्थानांतरण शिक्षकाचे समायोजन व ईतर आस्थापना विषयक सर्व बाबीवर कार्यवाही करणे. ३.कर्मचा-यांच्या रजा मंजुर करणे, ४.भ.नि.नि. परतावा अग्रीम मंजुर करणे , ५. कर्मचा-याचे सेवा निवृत्ती प्रकरणे सबंधीत खाते प्रमुखास सादर करणे, ६.कर्मचा-या विरुध्द खाते चौकशीचे प्रस्ताव मु.का.अ. यांना सादर करणे. ७.प.स. अंतर्गत असलेल्या विवीध शासकीय योजनाची अंमलबजावणी करणे व देखरेख ठेवणे. ८.वर्ग-३ व वर्ग-४ कर्मचा-यांचे बदली प्रस्ताव मु.का.अ. यांचेकडे सादर करणे.	---,,---	
३	---,,---	अधिकार – फौजदारी निरंक		
४	---,,---	अधिकार – अर्धन्यायिक निरंक		
५.	सहायक गट विकास अधिकारी	सहाय्यक गट विकास अधिकारी यांच्याकडे स्वतंत्रपणे सोपविलेल्या कामांची सूची. **अनुसूची क्र.1** 1) सहाय्यक गट विकास अधिकारी यांच्याकडे कृषि, समाजकल्याण, महिला व बालकल्याण आणि पशुसंवर्धन विभागाचा स्वतंत्र कार्यभार असेल, तसेच या चार विभागांकरिता प्रथम अपिलीय माहिती अधिकारी म्हणून काम पहातील. 2) ग्रामपंचायत - पाणी शुध्दीकरण :- नवसंजीवनी योजना, हिरवे/पिवळे/लाल कार्ड संनियंत्रण 3) ग्रामपंचायत कर्मचा-यांच्या सेवाविषयक सर्व बाबी. 4) तालुका मोफत कायदे विषयक सल्लागार समितीचे सचिव म्हणून काम करणे. 5) तालुका तक्रार निवारण अधिकारी. 6)एम.आय.एस. तालुका MIS समन्वयक अधिकारी म्हणून काम पहाणे (मासिक प्रगती अहवाल सहाय्यक गट विकास अधिकारी यांच्या स्वाक्षरीने सादर करणे. 7) गट विकास अधिकारी गट-अ हे शासकीय कामानिमित्त दौ-यावर असतील अशा वेळी सहाय्यक गट विकास अधिकारी हे निवासी प्रशासकीय अधिकारी म्हणून दैनंदिन कामकाज पाहण्यासाठी जबाबदार असतील.	शासन निर्णय क्रमांक मविसे-१०/२०१४ प्र.क्र.२०१/आस्था-३ (अ) दि. ३० ऑक्टोबर २०१४	

		अनुसूची क्र.2 सहाय्यक गट विकास अधिकारी यांच्यामार्फत सादर करावयाच्या विषय/ संचिका. १.पंचायत समिती स्तरावरील सर्व आस्थापना विषयक बाबी. २.पंचायत समितीचा अर्थसंकल्प तयार करणे. ३.पंचायत राज समितीचे अनुपालन अहवाल. ४.लोकलेखा समितीचे अनुपालन अहवाल, ५.विभागीय आयुक्त यांना तपासणी अहवाल. ६.ग्रामपंचायतीच्या कायदेशीर बाबी. ७.ग्रामपंचायत यांच्या मासिक सभा व ग्रामसभांचे संनियंत्रण. ८.पं. स. स्तरावरील पूर्ण टपालाची पाहणी, वाटप, आवक - जावक, ९.पं. स. स्तरावरील सर्व कोर्ट प्रकरणे / कायदेविषयक बाबी नियंत्रण. १०.राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान याबाबतच्या प्रशिक्षणाचे संनियंत्रण, ११.महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना. १२.यशवंत पंचायत राज अभियान १३. महात्मा गांधी तंटामुक्त गांव अभियान. १४.मा. मु.का.अ./अतिरिक्त मु.का.अ./गट विकास अधिकारी यांना आवश्यकता वाटल्यास शासन निर्णय दि. 30 ऑक्टोबर 2014 नुसार अनुसूची 1 व 2 व्यतिरिक्त कोणतेही अतिरिक्त काम सहायक गट विकास अधिकारी यांचेकडे असतील		
६	गट शिक्षणाधिकारी	**अ) शैक्षणिक भूमिका** १.जि.प. प्रा. शाळांच्या कामकाजावर देखरेख व नियंत्रण ठेवणे. २.जि.प. प्रा. शाळा व अनुदानप्राप्त खाजगी प्राथमिक शाळा या संस्थांना वेळोवेळी भेटी देऊन मार्गदर्शन करणे. सहकार्य वाढविणे. ३.पूर्व प्राथ.अनौपचारिक व प्रौढशिक्षण इ. वर लक्ष देणे, मार्गदर्शन करणे. ४.प्राथ.,माध्य., खा.प्रा. शाळा, अन्य विशेष शाळांची शि. वि.अधिकारी यांच्या मदतीने वार्षिक तपासणी करणे. ५.शै. दृष्ट्या अविकसित शाळा, कमी निकालाच्या शाळांना भेटी देणे, सुधारण्यासाठी प्रयत्न करणे. ६.शिक्षणाधिकाऱ्यांना उच्च माध्य. शाळा तपासणीस मदत करणे. ७.शै. दर्जा सुधारणेसाठी शिबिरे, कृतिसत्रे, परिसंवाद, चर्चा, प्रशिक्षण वर्ग इ. द्वारे शिक्षकांना सेवांतर्गत प्रशिक्षण देणे, विविध योजनांची कार्यवाही करणे, मार्गदर्शन करणे. ८.शिक्षक, समाज व शाळा यांच्यामध्ये सुसंवाद व सहकार्य वाढविणे. सहशालेय कार्यक्रमात सहभागी करून घेणे. ९.वरिष्ठांकडून शै. कार्यक्रमांबाबत आलेल्या सूचनांचे पालन करणे. **ब) प्रशासकीय भूमिका** १.विकासगटातील शालेय स्तरांवरील सर्व शै. संस्थांचे व्यवस्थापनावर लक्ष देणे. नियमानुसार प्रशासकिय कारवाई करणे. २.जि. प. शाळेतील शिक्षक संख्या शाळानिहाय निश्चित करणे. ३.शिक्षण विषयक सर्व माहिती संकलित करून वरिष्ठांना पाठविणे. (संख्यिकी तपासणी). ४.आलेल्या तक्रारी अर्जांची चौकशी करणे व नियमानुसार जरूर ती कार्यवाही करणे. ५.नवीन प्राथ. माध्य. व उच्च माध्य. शाळा उघडण्याबाबत, नवीन उघडलेल्या शाळांना मान्यता देण्याबाबत, अनुदान प्रदान करणे, मान्यता काढून घेणे इ. बाबत जरूर ते प्रस्ताव शिक्षणाधिकाऱ्यांकडे सादर करणे. ६.जादा तुकड्यांबाबत शिफारस करणे. ७.विविध परीक्षांचे आयोजन करणे. (शिष्यवृत्ती, नवोदय, बोर्ड	जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील तरतुदी नुसार	

		परीक्षा इ.)., विविध शिष्यवृत्त्या, सवलती विद्यार्थ्यांना वेळेवर मिळतात किंवा कसे ते पाहणे. ८.सर्व शि.वि. अ. यांच्यावर नियंत्रण ठेवणे. व त्यांच्या कामामध्ये सुसंवाद राखणे. ९.विविध योजनांची अंमलबजावणी होते का ? योजना उत्कृष्टपणे वेळेवर राबविल्या जातात का ? यावर देखरेख ठेवणे. उदा. पुस्तक पेढी, तांदूळ वाटप, उपस्थि भत्ता, गणवेश वाटप, फर्निचर, सवलती.,प्रा. शिक्षकांचे पगार, खाजगी संस्थांना अनुदाने इ. कामे वेळीच होतील याची दक्षता घेणे. १०.कर्मचाऱ्यांचे वेतन, शिक्षक वेतन, निवृत्ती वेतन प्रकरणे इ. कडे लक्ष देणे. ११.वरिष्ठांकडून वेळोवेळी आलेली कामे सूचनेप्रमाणे वेळेवर पार पाडणे. १२.पंचायत समिती व अन्य सभांना उपस्थित राहणे. १३.कर्मचाऱ्यांचेवर नियंत्रण ठेवणे, त्यांचे गोपनीय अहवाल ठेवणे. १४.प्रा. शाळांना गरजेनुसार साहित्याचे वाटप करणे. १५.शाळांना आकस्मिक भेटी देऊन कामकाजाची पाहणी करणे. १६.शिक्षणाच्या गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करणे. विविध उपक्रम हाती घेणे. १७.शिक्षण विभागाशी संबधीत प्रथम अपिल निकाली काढणे		
७.	सहायक आयुक्त पशुसंवर्धण व दुग्ध्यवसाय , (तालुका पशुसंवर्धण अधिकारी) नेर	१.पंचायत समिती अंतर्गत असलेल्या पशुवैद्यकीय चिकित्सालय यांना भेट देवून कार्यपुर्ती करुन घेणे. २.पंचायत समिती स्तरावरील पशु संवर्धन खात्यातील विविध योजना जसे - शेळी गट, दुधाळ जनावरे गट, कुकुट विकास गट, उच्च प्रतीचा बोकड वाटप हया योजना राबवुन योजनेचे उदिष्टाची पुर्तता करणे ३.विभागाशी संबधीत माहितीबाबत जन माहीती अधिकारी म्हणुन कलम ७ नुसार कार्यवाही करणे	जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील तरतुदी नुसार	
८.	अधिक्षक वर्ग २ (शालेय पोषण आहार)	**प्रशासकीय जबाबदाऱ्या :-** १) शालेय पोषण आहार योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणे. २) विहित मुदतीत तांदूळ व धान्य आदी मालाची मागणी करणे. पुरवठादाराने पुरवठा केलेल्या मालाच्या दर्जाची व वजनाची तपासणी करून खात्री करणे. सदर माल विहित मुदतीत शाळांना पुरवठा होत असल्याची खात्री करणे. ३) पुरवठादाराने पुरवठा केलेला माल निकृष्ठ दर्जाचा आढळून आल्यास सदर माल बदलून घेणे तसेच वजनामध्ये तफावत आढळून आल्यास अथवा पुरवठादाराने शाळांना विहित मुदतीत मालाचा पुरवठा न केल्यास संबंधित पुरवठादारास सक्त ताकीद देवून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करणे. अशा बाबी वारंवार घडत असल्यास व संधी देवून देखील कामकाजात सुधारणा न झाल्यास संबंधित पुरवठादारांकडून काम काढून घेण्याबाबत शिक्षणाधिकारी यांना अहवाल सादर करणे. ४) एकात्मिक बाल विकास योजना कार्यालयाच्या सहकार्याने बालकांच्या कुपोषण निर्मूलनाचे काम करणे. ५) शालेय पोषण आहाराच्या बाबतीत प्राप्त तक्रारींची योजनेच्या अनुषंगाने चौकशी करणे, चौकशीमध्ये तथ्य आढळून आल्यास संबंधितांवर दंडात्मक प्रशासकीय कार्यवाही करणे. शालेय पोषण आहार योजनेतंर्गत तक्रार निवारण अधिकारी म्हणून काम पाहणे. ६) शाळांमध्ये अन्न शिजवून देणाऱ्या बचतगट, शासनाच्या निकषानुसार योग्य प्रमाणामध्ये पोषण आहार शिजवून देत नसतील अथवा शिजवून दिलेल्या अन्नाचा दर्जा योग्य ठेवत नसतील तर अशा बचत गटाकडून अन्न शिजवून देण्याचे काम काढून घेणे व गंभीर प्रकरणांमध्ये संबंधित बचत गटास काळ्या यादीत टाकण्याबाबत कारवाई करणे.	महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय १२ जुन २०१७	

		७) शालेय पोषण आहार योजनेशी संबंधित शासनाने मागविलेली माहिती वेळोवेळीशासनास सादर करणे, **शैक्षणिक कामे :** १) ई-गव्हर्नन्स सेल प्रमुख म्हणून तालुकापातळीवर काम पाहणे. २) सरल सॉफ्टवेअर मध्ये माहिती भरणे, माहिती अद्ययावत करणे इत्यादी कामकाज पाहणे. **आर्थिक बाबी :-** १) शाळेतील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या वैयक्तिक लाभाच्या योजना (उदा. उपस्थिती तयार करणे व वरिष्ठांकडे पाठविणे. २) स्थानिक निधी लेखातपासणी, विभागीय आयुक्त तपासणी तसेच पंचायत राज समिती तपासणीकरीता अभिलेखे उपलब्ध करून देणे व आक्षेपांचा निपटारा करणे.		
९.	सहाय्यक प्रशासन अधिकारी	१.कार्यालय प्रमुखांचे गैरहजेरीत कार्यालयीन कामकाजावर नियंत्रण ठेवणे, २.दैनदिनी कर्मचारी हजेरी पत्रकावर नियंत्रण, ३.दैनदिनी फिरती नोंदवहीवर नियंत्रण,कार्यालय प्रमुख यांच्या दैनदिनी व आगाऊ फिरती कार्यक्रम नोंद वहयावर नियंत्रण, ४.वरीष्ठ कार्यालयाकडील अधिकारी / पदाधिकारी यांच्या दौ-यांचे वेळी त्याच्या व्यवस्था पाहणे, ५.स्थानिक स्तरावरील अधिकारी व पदाधिकारी यांचा समन्वय साधणे, ६.तालुका अंतर्गत कार्यालयावर नियंत्रण व देखरेख, ७.विधानसभा तारांकीत प्रश्न /अतारांकीत प्रश्न, लोकायुक्त प्रकरणे निपटारा करणे, ८.विविध शाखाकडुन प्राप्त झालेल्या नस्तीवर अभिप्राय देवून ग.वि.अ.यांचे कडे स्वाक्षरीस्तव सादर करणे कार्यालयास निर्देशित करणे त्यानुसार पत्र व्यवहाराची कार्यवाही करुन घेणे, ९.मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.यवतमाळ व ग.वि.अ. यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार कामकाज करणे	महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग दि. २५ फेब्रुवारी २०१९	
१०.	सहायक लेखा अधिकारी	१.पंचायत समितीच्या लेखा शाखेचे त्यांना विभागप्रमुख म्हणून समजण्यात येईल, २.लेखा शाखेतील कर्मचारी त्यांच्या मार्गदर्शनाखाली आपली कामे व कर्तव्य पार पाडतील ३. वित्त व अर्थसंकल्प आणि लेखे यांच्याशी सबंधित असलेल्या सर्व नस्तीवर मार्गदर्शन करणे तथा अभिप्राय नोंदवणे, ४.पंचायत समितीचे वित्तीय सल्लागार असेल, ५.पंचायत समितीच्या सबंधित विभागाकडून आर्थिक व्यवहारासबंधित त्या त्या वेळी अमलात असलेल्या नियमांचे व आदेशाचे पालन करण्यात येत आहे हे पाहण्याची त्यांची जबाबदारी राहील जर त्यांना असे वाटले की, एखादया खर्चाच्या व्यवहारासबंधी कोणताही व्यवहार किंवा आदेश त्यांच्याबाबतीत लेखा परीक्षणात आक्षेप येण्याची शक्यता आहे त्या बाबत कारणासहीत सबंधित विभागाला कळविल. ६.स्थानिक निधी निरीक्षण पथकाने घेतलेल्या आक्षेपाचा निपटारा करणे, ७.लेखा शाखेतील सर्व लेखा विषयक कामे व क.ले.अ ./रोखपाल /भांडारपाल/पेन्शन यांचे कामावर देख रेख ठेवणे तथा वेळेची वेळी करुन घेणे	कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन क्रमांक जिपका-२०१३ प्र.क्र.८० आस्था -९ ग्राम विकास व पंचायत राज विभाग दि.२२ फेब्रुवारी २०१३	

११.	कनिष्ठ प्रशासन अधिकारी	१.आस्थापना विषयक कामकाजावर नियंत्रण ठेवणे, २.मा. आयुक्त/मु.का.अ./उप मु.का.अ. यांचे तपासणी टिपणीतील शंकाची पुर्तता करणेबाबत सबंधित कर्मचा-यांचे सहकार्याने कामकाज करणे, ३.सर्व कर्मचा-यांचे कार्यविवरणपत्रांचा गोषवारा एकत्रित करणे ४. टपाल विभागातील नोंदवहया एकत्रित करणे, ५. लिपीक वर्गीयांची दप्तर तपासणी करने, ६.दैनदिन टपालावर मार्कींग व वितरण कामावर देखरेख ठेवणे, ७.विधानसभा / तारांकीत/ अतारांकीत प्रश्न संदर्भ व महत्वाचे शासकीय संदर्भाचे निर्गतीबाबत सबंधित कर्मचा-यांचे सहकार्याने दक्षता घेणे, ८.कर्मचारी/ अधिकारी/ पदाधिकारी यांचे प्रशिक्षण विषयक कामकाजावर नियंत्रण ठेवणे व त्यांसदर्भात पर्यवेक्षीय जबाबदारी सांभाळणे, ९.पंचायत समिती सभा आणि त्या संदर्भातील पत्रव्यवहार नियंत्रण, १०.न्यायालयीन प्रकरणी कर्मचा-यांच्या सहकार्याने कागदपत्राची पुर्तता करणे, ११.कार्यालयीन कर्मचा-याचे कार्यालयीन टीपणीवर अभिप्राय देणे ,देखरेख ठेवणे, १२.मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.यवतमाळ व ग.वि.अ. यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार कामकाज करणे	महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग दि. २५ फेब्रुवारी २०१९	
१२.	कनिष्ठ लेखा अधिकारी	१.निवृत्ती वेतन शाखेवर नियंत्रण, त्यांच्या नोंदवहया अद्यावत करुण घेणे, २.दरमहा रोजकोर्दीची शिल्लक व बॅकेतील शिल्लक यांचा नियमितपणे ताळेबंद घेऊन बॅक ताळेबंद अद्यावत ठेवणे, ३.प्राप्त होणारी देयकांची तपासणी करुन सहायक लेखा अधिकारी यांचेमार्फत गट विकास अधिकारी यांचेकडे स्वाक्षरीकरीता सादर करणे	कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन क्रमांक जिपका-२०१३ प्र.क्र.८० आस्था -९ ग्राम विकास व पंचायत राज विभाग दि.२२ फेब्रुवारी २०१३	
१३.	वरिष्ठ सहायक (लेखा)	१.सहायक लेखा अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली आपली कामे व कर्तव्य पार पाडणे, २.लेखा विभागात सहायक म्हणुन काम करणे ३.पारीत झालेल्या देयकाची खर्च नोंद पंजीमध्ये नोंद करणे, ४.अग्रीम ठेव, अनामत रकमांची नोंदवही अदयावत करणे, ५.वरीष्ठ कार्यालयाने ठरवुन दिलेली नियतकालीके नियमितपणे पाठविण्याची कार्यवाही करेल ६. अनुदान पंजो, मासिक लेखे तसेच देयकांच्या मुळ प्रती जतन करुन ठेवेल.	कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन क्रमांक जिपका-२०१३ प्र.क्र.८० आस्था -९ ग्राम विकास व पंचायत राज विभाग दि.२२ फेब्रुवारी २०१३	
१४	वरिष्ठ सहायक (लिपीक)	१.वरीष्ठ सहायक यांच्या अधिनस्त कनिष्ठ सहायक यांच्या सहाय्याने नेमूण दिलेली कामे करुन घेणे व जेथे त्यांच्या अधिनस्त कनिष्ठ सहायक नसतील तेथे ते सर्व कामे स्वत: करणे, २.अधिनस्त कनिष्ठ सहायक यांनी सादर केलेली टिपणी नियमानुसार वस्तुस्थितीदर्शक आहे किंवा कसे हे तपासुन अभिप्राय नोंदविणे, ३.अधिकारी व कर्मचा-यांची सेवा विषयक सर्व प्रकरणे हाताळणे, जसे स्थानांतरण प्रकरणे, रुजू करुणे घेणे, सेवा निवृत्ती प्रकरणे , ४.वरिष्ठ कार्यालयाशी पत्र व्यवहार, ५.दरमहा वेतन देयके तयार करणे, ६.वेतन या बाबीवर खर्चाच्या दृष्टीने मासिक / त्रैमासिक/ वार्षिक अंदाजपत्रके, रिक्त पदांचा अहवाल, ७.कर्मचा-यांच्या विभागीय चौकशी प्रकरणे तयार करणे, ८.निरीक्षण टिपणी मुददा तसेच लेखा परीक्षण मुदयांची पुर्तता सादर करणे, ९.अभिलेख वर्गिकरण जतन व नाशन करणे, १०.स्थायी आदेश संचिका अदयावत ठेवणे,	महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग दि. २५ फेब्रुवारी २०१९	

		११.क्षेत्रिय कर्मचारी व अधिकारी यांच्या संभाव्य व प्रत्यक्ष दौरा दैनदिनी मंजुरीकरीता सादर करणे, १२.भ.नि.निधिचे परतावा / ना परतावा प्रकरणे, १३.सेवा पुस्तके अदयावत ठेवणे, त्यांच्या वैयक्तीक नस्त्या हाताळुण जतन करुन ठेवणे, १४.बदल्यांची माहीती तयार करुन विभागीय कार्यालयास सादर करणे, १५.आश्वासीत प्रगती योजनेचे प्रस्ताव तसेच सेवाजेष्ठता यादया विभागीय कार्यालयास सादर करणे, १६. कर्मचारी तसेच अधिकारी यांच्या विविध पध्दतीच्या वेतननिश्चिती करणे, १७. वैद्यकीय देयक तपासुन वरीष्ठ कार्यालयात सादर करणे, १८. ग.वि.अ यांनी सांगीतलेले वेळोवेळी काम करणे.		
१५	कनिष्ठ सहायक (लिपीक)	१.कार्यालयीन टपाल घेणे, २.वरीष्ठांना सहायक म्हणून काम करणे, ३.स्थायी आदेश संचिका ठेवणे व जतन करणे, ४.नियतकालीक अहवालाचे संकलन करणे, ५.सेवा निवृत्ती वेतन / कुटुंब निवृत्ती वेतन प्रस्ताव तयार करणे, ६.कर्मचा-याचे सेवार्थ प्रणालीमधील वेतन देयके तयार करणे, ७.वेतन वाढी प्रकरण सादर करणे, ८.रजा प्रकरणे मंजुरीस सादर करणे, ९.कर्मचा-याचे भ.नि.नि. अग्रीम प्रकरण सादर करणे, १०.गट विमा प्रस्ताव तयार करणे, ११.वैद्यकीय देयक तपासुन वरीष्ठ कार्यालयात सादर करणे, १२.जिल्हा परीषदेअंतर्गत व शासनांच्या योजनांची माहीती विस्तार अधिकारी यांनी एकत्रित करुन दिलेली माहीती संगणीकृत करुन वरीष्ठ कार्यालयात पाठविणे, १३.आंतरजिल्हा बदली प्रस्ताव तपासून सादर करणे, १४.अभिलेख्यांचे वर्गिकरण करुन वर्गिकरणानुसार नस्त्या अभिलेख कक्षात पाठविणे, १५.प्रेषक शाखेमध्ये CRU कक्षामध्ये (कार्यालयीन नोंदी विभाग),कार्यालयामध्ये प्राप्त डाक स्विकारुन स्कॅन करुन कनिष्ठ प्रशासन अधिकारी यांचेकडे मार्कींगकरीता सादर करणे, १६.पंचायत समितीमधील सबंधित विभागाकडून e office व्दारे आलेली ऑनलाईन पत्रे सबंधित विभागाकडे e office व्दारे पाठविणे., १७.आवक जावक विभागांसाठी तिकीटांचा हिशोब ठेवणे, व त्यासाठी आवश्यक नोंदवहया ठेवणे व जतन करणे जसे – टपालासाठी मा. मंत्री महोदय, मा. खासदार, मा. आमदार, मा.जि.प.अध्यक्ष, मा. आयुक्त / उपायुक्त, विधानसभा तारांकीत प्रश्न, तक्रार नोंदवही, लोकशाही दिन नोंदवही, १८.अभिलेख कक्षातील वर्गिकरणानुसार दस्तऐवज लावणे व जतन करणे, १९.माहीतीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कार्यालयास प्राप्त झालेले जोडपत्र अ , जोडपत्र ब, व मा. राज्य माहीती आयुक्त अमरावती खंडपिठ यांचेकडून प्राप्त झालेले व्दितीय अपिलावर कार्यवाही करणे, २०.साहीत्य वाटप करणे, २१.जंगल मालमत्ता रजिष्टर, २२.अचल संपतीची पंजी ठेवणे, इतिहास पंजी, २३.सादील देयके तयार करणे, सादील खर्च पंजी, २४.वाहनाचे लॉगबुक ठेवणे, डिझेल नोंदवही ठेवुन, विमा काढणे, २५.पंचायत समीती कार्यालया करीता खरेदी करावयाच्या साहित्याची नियमानुसार नस्ती तयार करणे व प्राप्त झालेल्या साहित्यांची नोंद साठा पंजीत घेवुन साहित्याचे वाटप करणे,	महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग दि. २५ फेब्रुवारी २०१९	

		२६. गोदामात असलेल्या साहित्याची नीगा राखणे तसेच निरुपयोगी साहित्याची शासनाचे नियमानुसार लीलावाची कार्यवाही करणे, २७.समाजकल्याण व ईतर योजनाविषयक कार्यवाही करणे, २८.वृध्द साहितीक कलावंताने मानधन वाटप करणे, २९.निरीक्षण टिपणी मुददे तसेच लेखा परीक्षण मुदयांची पुर्तता सादर करणे, ३०. ग.वि.अ.यांनी सांगितलेली कामे करणे.		
१६	कनिष्ठ सहायक (लेखा)	१.सहायक लेखा अधिकारी यांचे मार्गदर्शनाखली कामे व कर्तव्य पार पाडणे, २.मंजुर देयकांचा धनादेश लिहणे, सर्व रोखपुस्तीका व धनादेश, बँक ड्राप तसेच कपाती पाठविल्याबाबत दस्तऐवज, ३.जमापंजी ठेवणे	कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन क्रमांक जिपका-२०१३ प्र.क्र.८० आस्था -९ ग्राम विकास व पंचायत राज विभाग दि.२२ फेब्रुवारी २०१३	
१७.	शाखा अभियंता / कनिष्ठ अभियंता	**कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता (Junior Engineer/Branch Engineer) - कर्तव्यसुची:** १. ग्रामपंचायत व पंचायत समिती अंतर्गत विकास कामांचे (रस्ते, नळयोजना, शाळा दुरुस्ती, बंद गटारे, अंगणवाडी ईमारत, स्मशानभुमी शेड सौदर्यीकरण, समाजमंदीर) तांत्रिक सर्वेक्षण करणे आणि अंदाजपत्रक (Estimates) तयार करणे. २.चालू असलेल्या बांधकामांची गुणवत्ता तपासणे व तांत्रिक देखरेख करणे. ३.कामाचे मोजमाप (Measurement) घेऊन मोजमाप पुस्तिकेत (MB) नोंद करणे आणि देयके (Bills) सादर करणे ४.वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तांत्रिक मंजुरी मिळवण्यासाठी प्रस्ताव पाठवणे. ५.कामांच्या प्रगतीचा अहवाल (Progress Report) गटविकास अधिकारी (BDO) व जिल्हा परिषदेला सादर करणे.		
१८.	स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक	**स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (Civil Engineering Assistant) - कर्तव्यसुची:** १.कनिष्ठ अभियंत्यांच्या मार्गदर्शनाखाली जागेची प्रत्यक्ष मोजणी करणे आणि लेआउट (Layout) टाकणे. २.बांधकामांचे छोटे नकाशे तयार करणे. ३. कामाच्या मोजमापासाठी कनिष्ठ अभियंत्यांना मदत करणे. ४.बांधकाम साइटवर दैनंदिन उपस्थित राहून गुणवत्तेवर देखरेख ठेवणे ५.कामाचे दैनंदिन रेकॉर्ड ठेवणे आणि आवश्यक कागदपत्रे तयार करणे. ६.थोडक्यात, कनिष्ठ अभियंता हे तांत्रिक नियंत्रक आणि प्रशासकीय जबाबदारी सांभाळतात, तर स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक हे तांत्रिक साहाय्य आणि प्रत्यक्ष साइट अंमलवजावणीचे काम करतात. ७. हातपंपाची सर्व कामे पाहणे,हातपंप वसुलीबाबत कार्यवाही करणे.		
१९.	कृषी अधिकारी (सामान्य)	१.कृषि विभागाकडील पत्रव्यवहार सांभाळणे, २.बियाणे खते व किटकनाशके या निविष्ठाबाबत शेतक-यांच्या तक्रारीबाबत तालुका स्तरीय कृषि निविष्ठा तक्रार निवारण समितीचे सचिव म्हणून कामकाज पार पाहणे, ३.महात्मा गांधी रोजगार हमी योजना (मनरेगा) अंतर्गत कृषि विषयक कामांना तांत्रिक मंजुरी प्रदान करणे, ४. कामावर सनियंत्रण ठेवणे व पुर्णत्वाचे दाखले निर्गमित करणे, ५.पिक कापणी प्रयोगावर पर्यवेक्षकिय स्वनियंत्रण ठेवणे, ६.लेखा परीक्षणास दप्तर उपलब्ध करुन देणे, व लेखा परीक्षणातील आक्षेपाची पुर्तता करणे,	वरीष्ठ प्रशासकीय अधिकारी, कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य पुणे यांचे जावक क्रमांक कृ.आ.पुणे/नस्ती/आस्था-४/२०२२/२४/२१११११ दि.२३ जुन २०२३ अन्वये कृषि	

		७. पंचायत समिती स्तरावरील राबविण्यात येणा-या कृषी विषयक सर्व योजनांचा आढावा घेणे, ८.पंचायत समिती कृषि विभागाकडील कार्यालय प्रमुख या नात्याने विस्तार अधिकारी कृषि यांचेवर स्वनियत्रंण ठेवुन विविध योजनांची अमलबजावणी करणे, ९. पिक कर्जासाठी पतमर्यादा निश्चित करणे जिल्हा मध्यवर्ती बँकेस शिफारस करणे, १०.क्रॉपसॅप प्रकल्पांच्या मार्गदर्शक जिल्हा परिषदेकडील कृषि अधिकारी यांच्यामार्फत प्रकल्पाअंतर्गत पिकांचे रॅन्डम सर्वेक्षण करणे, सदर पिकावरील किडरोगांची प्रत्यक्ष निरीक्षणे घेऊन ती मोबाईल ॲप व्दारे संगणक प्रणालीमध्ये ऑनलाईन संकेतस्थळावर भरणे, ज्या ठिकाणी किड रोगांचा प्राधुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या जवळ तसेच त्यावर गेलेला आहे त्या ठिकाणी क्षेत्रिय भेट देऊन त्याची खातरजमा करणे तसेच त्या ठिकाणची निरीक्षणे व तेथे किड नियंत्रणाकरीता केलेल्या उपाययोजनांचे तपशिल मोबाईल ॲपव्दारे नोंदविणे ११.कृषि अधिकारी यांनी अधिनस्त अधिकारी यांचेमार्फत केलेल्या कामांचे पर्यवेक्षण व सनियंण करणे, १२.राज्याच्या कृषि विस्तार कार्यक्रमांना विस्तार विषयक सुधारणाकरीता साहाय्य (आत्मा) अंतर्गत तालुका तंत्रज्ञान चमुमध्ये सदस्य म्हणून काम करणे, १३.राष्ट्रीय बायोगॅस व खत व्यवस्थापन कार्यक्रमांअंतर्गत सयंत्र उभारणीच्या कामाची तपासणी करणे व सनियंण करणे, १४. कृषि उत्पादन वाढीसंदर्भात शेतक-यांना तांत्रीक मार्गदर्शन करणे, १५.विविध कृषि पुरस्कार व पिक स्पर्धाबाबत कार्यवाही करणे, उपरोक्त तसेच त्या व्यतिरिक्त वेळोवळी वरीष्ठांनी सोपविलेली ईतर कामे पार पाडणे	अधिकारी (जि.प.)गट ब (कनिष्ठ)(राजपत्रीत) सवंर्गातील अधिका-यांच्या कर्तव्य व जबाबदा-या	
२०.	कृषी अधिकारी (वि.घ.यो.)	१.विशेष घटक योजना, आदीवासी उपयोजना, मिनी माडा योजना राबविण्याबाबत कार्यवाही करणे, २.आदीवासी क्षेत्राबाहेरील आदीवासी शेतकऱ्यांसाठी योजना राबविणे (ओ.टी.एस.पी. योजना), ३.डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना – (क्षेत्राअंतर्गत / क्षेत्राबाहेरील) राबविण्याच्या अनुषंगाने लॉटरी मध्ये निवड झालेल्या लाभार्थींची कागदपत्रे ऑनलाईन पडताळणी करणे, अपुर्ण कागदपत्रांची पुर्तता करुन घेणे, पात्र लाभार्थ्यांची स्थळ पाहणी (मोका तपासणी) करणे, मंजुरीनुसार लाभार्थ्यांना कार्यारंभ आदेश / पुर्व संमती आदेश बजावणे, सिंचन विहीर कामांचे रेखांकन करणे, सिंचन विहीर , जुनी विहीर, दुरुस्ती व इनवेल बोर कामांचे मोजमाप करणे, मोजमापानुसार मोजमाप पुस्तीकेमध्ये नोंदी घेणे, ऑनलाईन देयके जिल्हा परीषद स्तरावर सादर करणे, ४.पुर्वसंमती आदेशानुसार पंप संच / सोलारपंप / विजजोडणी / शेततळे अस्तीरीकरण मोका तपासणी करणे, ५.ऑनलाईन देयके जिल्हा परिषद स्तरावर सादर करणे, ६.राष्ट्रीय कृषि विकास योजना – (अनुसूचीत जाती / अनुसूचीत जमाती) राबविण्याच्या अनुषंगाने लॉटरी मध्ये निवड झालेल्या लाभार्थींची कागदपत्रे ऑनलाईन पडताळणी करणे, ७.अपुर्ण कागदपत्रांची पुर्तता करुन घेणे, ८.पात्र लाभार्थ्यांची स्थळ पाहणी (मोका तपासणी) करणे, मंजुरीनुसार लाभार्थ्यांना कार्यारंभ आदेश / पुर्व संमती आदेश बजावणे, ९.सिंचन विहीर कामांचे रेखांकन करणे, १०.सिंचन विहीर कामांचे मोजमाप करणे, मोजमापानुसार मोजमाप पुस्तीकेमध्ये नोंदी घेणे, ऑनलाईन देयके जिल्हा परीषद स्तरावर	वरीष्ठ प्रशासकीय अधिकारी, कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य पुणे यांचे जावक क्रमांक कृ.आ.पुणे/नस्ती/आस्था-४/२०२२/२४/२११११ दि.२३ जुन २०२३ अन्वये कृषि अधिकारी (जि.प.)गट ब (कनिष्ठ)(राजपत्रीत) सवंर्गातील अधिका-यांच्या कर्तव्य व जबाबदा-या	

		सादर करणे, ११.महात्मा गांधी रोजगार हमी योजना (मनरेगा) अंतर्गत कृषि विषयक कामांना तांत्रीक मंजुरी प्रदान करणे, १२.कामावर सनियंत्रण ठेवणे व पुर्णत्वाचे दाखले निर्गमित करणे, १३.लेखा परीक्षणास दप्तर उपलब्ध करुन देणे, व लेखा परीक्षणातील आक्षेपाची पुर्तता करणे, १४.सुक्ष्मसिंचन योजनेत शेतकरी / लाभार्थ्यांना पुरक अनुदानाचो रक्कम अदा करणे, १५. लाभार्थीची विभागाशी संबधीत माहिती बाबज जन माहितो अधिकारी म्हणुन कार्यवाही करणे.		
२१.	विस्तार अधिकारी (कृषी)	१.खरीप, रब्बी व उन्हाळी हंगाम पिक पेरणी व पिक परीस्थितीबाबत अहवाल तयार करणे, २.दैनदिनी पाऊसमान संदर्भातील अहवाल सादर करणे, ३.नैसर्गिक आपत्तीमुळे (अतिवृष्टी / पुर / गारपिट व इतर) पिंकाचे नुकसानीबाबत अहवाल सादर करणे, ४.अवर्षनजन्य परिस्थितीत पिकांचे नुकसानीचे वा नैसर्गिक आपत्तीमध्ये पिक नुकसानीचे पंचनामे करणे व अहवाल सादर करणे, ५.सुधारीत अवजारे, किटकनाशके औषधे व जिप्सन खताचे, जैविक खताचे वाटप करण्याची कार्यपध्दती करणे, ६.सिंचन योजना पिक सरक्षण योजनेची कामे पार पाडणे, ७.पिकांवरील किड व रोगांबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे व त्या संदर्भातील साप्ताहीक अहवाल सादर करणे, ८.बायोगॅस योजना, महाउर्जा योजना राबविणे, ९. जिल्हा परीषद सेस फंड योजना, पंचायत समिती सेस फंड योजना राबविणे, १०.महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती, अधिनियमातील तरतुदीच्या अनुषंगाने जिल्हा परीषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उपरोक्त कार्यसुचीमधील व त्या व्यतिरिक्त वेळोवेळी सोपविलेली इतर कामे पार पाडणे,	महाराष्ट्र शासन शासन निर्णय क्रमांक कार्यसुची २००७ प्रकरण क्रमांक १३२/आस्था – ९ ग्रामविकास व जलसंधारण विभाग दि. १९ एप्रिल २००७	
२२.	विस्तार अधिकारी (पंचायत)	१.पंचायत समीती अंतर्गत असलेलया ५१ ग्रामपंचायतीची तपासणी करणे, २.ग्रामपंचायतीचे आर्थिकबाबी व इतर कामकाजावर नियत्रंण ठेवणे, ३.ग्राम पातळीवरील तक्रारी निकाली काढणे तसेच मग्रारोहयो अंतर्गतची सर्व प्रकारचे कामाबाबतची कार्यवाही करणे, ४. विभागाशी संबधीत माहिती बाबत जन माहिती अधिकारी म्हणुन कार्यवाही करणे. ५.मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या परवानगीने ग्रामपंचायत कार्यालयातील अभिलेखे नोंदवहीची तपासणी किवा निरीक्षण करणे, ६.प्रत्येक महिन्यात 10 ग्रामपंचायतीचे सखोल निरीक्षण करणे, ७.ग्रामपंचायतीला दिलेल्या भेटीत पंचायतीकडील छापील नमुन्याच्या संग्रहाची पडताळणी करणे, ८.ग्रामपंचायतीचे वार्षिक लेख्यातील सर्व बाबीची तपासणी करणे,तसेच ग्राम विकास निधी कर्ज वसुलीबाबत ग्रामपंचायतींचा नियमित आढावा घेऊन विहीत मुदतीत कर्जाची वसुली ग्रामपंचायतीकडून करवुन जिल्हा परिषदेस सादर करणे., ९.ग्रामपंचायतीने दाखल केलेल्या अंदाजपत्रकातील सर्व बाबी तपासणी करुन पंचायत समिती सभेची मान्यता घेवून एक प्रत ग्रामपंचायतीस देणे व वेळोवेळी मार्गदर्शन करणे., १०.ग्रामपंचायतीकडून रु.500 पेक्षा जास्त रकमेचे धनादेशाद्वारे प्रदाने न करता, मोठ्या रक्कमांचे रोखीने प्रदाने करणे, अभिलेखे न ठेवणे व रोकड वही न ठेवणे किंवा अयोग्य प्रकारे ठेवणे अशा प्रकारच्या अनियमितता आढळून येवू नये तसेच ग्रामपंचायतीच्या आर्थिक व्यवहारात गैरव्यवहार होण्यास चालना मिळू नये म्हणून ग्रामपंचायत अभिलेख्यांची वेळोवेळी तपासणी करुन योग्य पर्यवेक्षणात्मक नियंत्रण ठेवणे.,	महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण – २०२२ / प्र.क्र.८१७/आस्था-०७ दि.३० जुन २०२५	

		११.ग्रामपंचायत अभिलेख्याचे वर्गीकरण करुन घेणे., १२.ग्रामपंचायत क्षेत्रात पाणी पुरवठा निधीची अंमलबजावणी होते किंवा नाही याबाबत तपासणी करणे, १३.ग्रामपंचायत कार्यालयात विवाह नोदणी बाबत निबंधकाने अद्ययावत नोंदी घेतल्या किंवा नाही याची तपासणी करणे, १४.ग्रामपंचायतीच्या कारभारावर नियंत्रण ठेवणे., १५.ग्रामपंचायत लेखा परिक्षण करुन घेणे, लेखा आक्षेपांची पूर्तता ग्रामपंचायतीकडून करून घेऊन पंचायत समिती सभागृहाची मान्यता घेवून अनुपालन उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) जिल्हा परिषद यांचेकडे सादर करणे लेखा परिक्षण विशेष अहवालाच्या स्वतंत्र नोदी ठेवणे व अपहारीत रक्कम वसुली बाबत कार्यवाही करणे., १६.ग्रामपंचायतीने लावलेले कर भांडवली मुल्यावर आधारीत कराची आकारणी योग्य पध्दतीने केली किवा नाही याची खात्री करणे, कर वसुलीचे उद्दीष्ट 100 टक्के साध्य करण्याबाबत पर्यवेक्षणीय मार्गदर्शन करुन उद्दीष्ट साध्य करुन घेणे. तसेच दर चार वर्षांनी भाडवली मुल्यावर आधारीत फेर आकारणी करुन घेणे., १७.ग्रामपंचायत स्तरावरील प्राप्त तक्रारीची चौकशी करुन चौकशी अहवाल वरिष्ठांना सादर करणे (लोकआयुक्त, अनुसूचित जाती, जमाती आयोग, लोकशाही दिन, पंतप्रधान कार्यालय, विभागीय आयुक्त स्तरावरील तक्रारी, शासन स्तरावरील तक्रारी, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम,1958चे कलम 7,36,39 व 40 ची प्रकरणे १८.ग्राम पंचायत अधिकारी यांच्यावर नियंत्रण ठेवणे, १९.वार्षिक अहवाल संकलित करुन जिल्हा परिषदेस सादर करणे., २०.दरमहा संभाव्य व मासिक दैनदिनी विहीत मुदतीत सादर करणे., २१.ग्रामपंचायत विभक्तीकरणाचा प्रस्ताव पाठपुरावा करुन जिल्हा स्तरावर सादर करणे, २२.दरमहा ग्राम पंचायत अधिकारी यांचा मासिक व पाक्षिक बैठका आयोजित करून आढावा घेणे, २३.ग्रामपंचायत स्तरावर होणाऱ्या विविध योजना व कामाची अमलबजावणी करण्यासाठी तांत्रिक बाब वगळून वेळोवेळी पर्यवेक्षण ठेवून कामे पूर्ण करुन घेणे (उदा. अनुसूचित जाती व नवबौध्द घटकाच्या वस्तीचा विकास करणे, ठक्करबाप्पा योजना, वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजना, वित्त आयोग, स्वच्छता अभियान, जनसुविधा/नागरी सुविधा योजना, पेसा-5 टक्के अबध निधी, २४.अनुसूचीत जमाती व इतर परंपरागत वन निवासी कायदा 2006 अंतर्गत वनहक्क दावे मजुरीबाबतची कामे व इतर सर्व प्रकारची कामे, २५.ग्रामपंचायत स्तरावर केंद्र/राज्य शासनाकडून राबविण्यात येणारे विविध अभियानात (पंचायत विकास निर्देशांक (P), माझी वसुधरा अभियान, आर आर आबा पाटील सुंदर गांव पुरस्कार, राष्ट्रीय पाया पुरस्कार, संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान व इतर अभियान) ग्रामपंचायतीचा सहभाग नोंदवून अभियान काळात काम करुन घेणे, २६.ग्रामपंचायत स्तरावर केंद्र/राज्य शासनाकडून उपलब्ध होणारे विविध ई पंचायत प्रकल्प (राष्ट्रीय कम स्वराज्य प्रकल्पाअंतर्गत आपले सरकार सेवा केंद्र) राबवून प्रशिक्षण घेणे ऑनलाईन नोंदी इ. कामे करुन घेणे, २७.ग्रामपंचायत अधिकारी यांच्या गोपनिय अहवालासाठी कामाचे मुल्यामापन करून त्याबाबतचे अभिप्राय गट विकास अधिकारी यांना सादर करणे, २८.ग्रामपंचायत अधिकारी याच्या कामकाजावर सपूर्ण नियंत्रण ठेवणे ग्रामपंचायत तपासणी दरम्यान काही त्रुटी आढळून आल्यास त्या संबंधाने संबंधीत ग्रामपंचायत अधिकाऱ्यांस लेखी ज्ञापन/पत्र देणे, २९. जिल्हा स्तरावरील विविध आढावा बैठकीस उपस्थित राहून आढावा देणे तसेच तालुका स्तरीय बैठकीत जिल्हा स्तरावरील अधिकारी यांच्या भेटीवेळी आढावा देणे.,		

		३०.सरपंच समितीचे सदस्य सचिव या नात्याने बैठका आयोजित करणे, ३१.गट विकास अधिकारी यांच्या आदेशान्वये ग्रामपंचायतीवर प्रशासक म्हणून कामकाज पाहणे, ३२.महिला व बालकल्याण विकास योजनांवर ग्रामपंचायतीस मिळणाऱ्या एकूण उत्पन्नाच्या १० टक्के रक्कम खर्च केली किंवा नाही याची खात्री करणे., ३३.ग्रामपंचायतीच्या एकूण उत्पन्नाच्या १५ टक्के रक्कम अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय याच्या उन्नतीसाठी, त्याच्या सामुहिक विकासासाठी व त्या वर्गातील व्यक्तींना वैयक्तीक लाभ होईल, अशा विहीत केलेल्या बाबीवर/योजनावर खर्च केला किंवा नाही याची खात्री करणे, ३५.ग्रामपंचायत यानी त्यांच्या स्वनिधीच्या एकूण उत्पन्नापैकी ५ टक्के दिव्यागाच्या कल्याण व पुर्नवसनाकरिता तरतुद करुन त्याच प्रयोजनावर खर्च केला किवा नाही याची खात्री करणे, ३६.ग्रामपंचायत दप्तर तपासणीच्या वेळी ग्रामसभा/मासिक सभा/महिला सभा/वॉर्ड सभा विविध समित्याच्या बैठकाच्या सुचना व कार्यवृत्त / इतिवृत्त विहीत नमुन्यात ग्रामपंचायतीनी ठेवले किंवा नाही याची खात्री करणे ग्रामपंचायतीने आयोजित केलेल्या काही बैठकांना उपस्थित राहणे., ३७.ग्रामपंचायत अधिकारी यांना आदर्श ग्रामपंचायत अधिकारी म्हणून सन्मानित करण्यासाठी त्यानी केलेल्या कामाचे मुल्यमापन करुन जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय पुरस्कारासाठीचे नामाकन प्रस्ताव जिल्हा स्तरावर सादर करणे, ३८.महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 अंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर प्राप्त अर्ज प्रलंबीत अर्जाचा निपटारा करण्याबाबत पाठपुरावा करणे, ३९. ग्रामपंचायत स्तरावरील बॅक खाती नियमानुसार असल्याची खात्री करणे, ४०.शासन स्तरावरुन विकसित करण्यात आआज्ञावली (PRIYA SOFT) मध्ये ग्रामपंचायत दरमहा नोटी करतात किवा नाही याबाबत खात्री करणे, ४१.ग्रामपंचायत तपासणीचे वेळापत्रक (कॅलेडर) प्रत्येक वर्षी तयार करून त्यानुसार ग्रामपंचायतींची तपासणी करणे, ४२.ग्रामपंचायत स्तरावरील जंगम व स्थावर मालमत्तेची पडताळणी करणे., ४३.अधिकार क्षेत्रातील ग्रामपंचायतीमधील गैरकारभाराच्या तक्रारीची चौकशी करुन वरिष्ठांना अहवाल सादर करणे, ४४.ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच व सदस्य यांच्या अपात्रतेबाबत प्राप्त निवेदनाच्या अनुषगाने अहवाल सादर करणे, ४५.विविध विकास कामांचे व इतर योजनाबाबत ग्रामपंचायत अधिकाऱ्यानी सादर केलेले प्रस्ताव तपासणी करुन पुढे पाठविणे, ४६.विकास योजना किया ग्रामपंचायतीच्या सर्वसाधारण निधीचा गैरवापर झाल्यास संबंधिताना अहवाल देणे., ४७.संसाधने वाढवण्यासाठी आणि ग्रामपंचायतीची आर्थिक स्थिती मजबूत करण्यासाठी ग्रामपंचायतींना मार्गदर्शन करणे, ४८.राज्यातील उपलब्ध प्रशिक्षण संस्था व शासन स्तरावरुन प्राप्त सुचनेनुसार त्यांच्या कार्यक्षेत्रातील सरपंच व सदस्य याना वेळोवेळी प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करणे., ४९.प्रशिक्षण संस्थाद्वारे आयोजित प्रशिक्षण अभ्यासक्रमांना सचिव आणि ग्रामपंचायतीचे इतर कर्मचारी, सदस्य उपस्थित राहावे याची खात्री करणे., ५०.ग्रामपंचायत स्तरावर नावीन्यपूर्ण उपक्रम राबविणे, ५१.राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियानांतर्गत सर्व उपक्रमाचा अभ्यास करणे, तालुका व गण स्तरावर घेण्यात येणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमाचे वेळापत्रकानुसार आयोजन व नियोजन करणे, तालुका		

२३	विस्तार अधिकारी (साख्यांकी)	१.पचायत समितीचे नियोजन अधिकारी म्हणून काम पाहणे., २.जनगणना विषयक कामांचे संनियंत्रण करणे., ३.सामाजिक,आर्थिक व जात गणनेबाबत कामकाज संनियंत्रण, ४.कर्मचारी गनणाविषयक कामांचे संनियंत्रण करणे., ५.जिल्हा सांख्यिकी कार्यालयासाठी तालुका नोडल अधिकारी म्हणून कामकाज करणे तसेच माहिती संकलित करुन याबाबतचे संनियंत्रण करणे., ६.विविध आढावा बैठकीसाठी विभागांची माहिती संकलित करुन एकत्रित माहिती गट विकास अधिकारी यांना सादर करणे व त्याबाबत सनियंत्रण करणे., ७.विविध योजनांचे मुल्यमापन करून त्याबाबतचा फलश्रुती अहवाल गट विकास अधिकारी याना सादर करणे., ८.वार्षिक प्रशासन अहवाल तयार करुन वरिष्ठ कार्यालयास सादर करणे., ९.जिल्हा नियोजन समिती अंतर्गत सर्व योजनांचे तालुका नोडल अधिकारी म्हणून कामकाज पाहणे., १०.गट विकास अधिकारी यानी वेळोवेळी सोपविलेली कामे करणे., ११.उपरोक्त सर्व कामे कनिष्ठ सहाय्यक/वरिष्ठ सहाय्यक याच्या सहाय्याने करणे.	महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण – २०२२ / प्र.क्र.८१७/आस्था-०७ दि.३० जुन २०२५	
२४.	विस्तार अधिकारी (शिक्षण)	**विस्तार अधिकारी (शिक्षण) यांची कर्तव्ये** (संदर्भ - शा. नि. क्र. पीआरई 2001/(2767)/प्राशि-1. दि. 3-9-2002) प्रशासकीय कर्तव्ये १) बीटमधील सर्व शैक्षणिक व प्रशासकीय बाबींचे संनियंत्रण करणे. २)बीटमधील सर्व शाळांचे प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाबाबतच्या कृतिकार्यक्रमानुसार आणि मार्गदर्शक सूचनांनुसार नियोजन व अंमलबजावणी करणे. ३)बीटमधील प्रत्येक शाळेस तपासणीपूर्व व तपासणीनंतर किमान एक भेट देणे. ४)बीटमधील सर्व पूर्व प्राथमिक शाळांची तपासणी करणे. तसेच 10 टक्के पर्यंत परंतु किमान 5 कनिष्ठ आणि वरिष्ठ प्राथमिक शाळांची तपासणी करणे. ५) नवीन खाजगी शाळा मान्यतेबाबत शिफारस करणे, सर्व खाजगी मान्यताप्राप्त अनुदानित व विनाअनुदानित प्राथमिक शाळांची शैक्षणिक, प्रशासकीय व आर्थिक तपासणी करणे, अनुदान आकारणी करणे व मान्यतेबाबत शिफारस करणे. ६) खाजगी मान्यताप्राप्त अनुदानित-विनाअनुदानित प्राथमिक शाळा, आश्रमशाळा यांचे कामकाज शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या नियम, अटी व शर्तीनुसार चालते किंवा कसे याबाबतची तपासणी करून वरिष्ठांकडे अहवाल पाठविणे. ७)बीटमधील कोणत्याही शैक्षणिक, आर्थिक व प्रशासकीय अनियमित व आक्षेपार्ह बाबींची प्राथमिक चौकशी करून वरिष्ठांना अहवाल देणे. ८)केंद्रप्रमुखांना पटनोंदणी, उपस्थिती आणि संपादणूक यांबाबतची लक्ष्ये ठरवून देणे. ९)बीटमधील केंद्रप्रमुखांचे गोपनीय अभिलेख लिहिणे. केंद्रप्रमुखांनी लिहिलेल्या शिक्षक व मुख्याध्यापकांच्या गोपनीय अभिलेखांचे पुनर्विलोकन करणे. १०)बीटमधील केंद्रप्रमुखांच्या नैमित्तिक रजा मंजूर करणे व त्यांच्या दीर्घ मुदतीच्या रजा अर्जांवर गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे शिफारस करणे ११) बीटमधील केंद्रप्रमुखांचा पुढील महिन्याचा संभाव्य शाळा (फिरती) संपर्क कार्यक्रम चालू महिना अखेरीपूर्वी मंजूर करून केंद्रप्रमुखांकडे देणे. १२) बीटमधील केंद्रप्रमुखांची मागील महिन्यांची दैनंदिनी योग्य त्या		

		अभिप्रायांसह गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे 10 तारखेपूर्वी मंजुरीसाठी सादर करणे. १३) बीटमधील सर्व केंद्रप्रमुखांच्या कामाचा आढावा घेणे, कामकाजामध्ये आवश्यक त्या सुधारणा घडवून आणणे. १४) बीट मुख्यालयी राहणे, बीट कार्यालयाचे दप्तर अद्ययावत ठेवणे, बीट कार्यालयात स्वत:चे हालचाल रजिस्टर व हजेरी रजिस्टर ठेवणे, १५) बीट प्रभाव क्षेत्रातील किमान एक केंद्र सल्लागार समिती व किमान एक ग्रामशिक्षण समिती यांच्या बैठकीस महिन्यातून किमान एकदा उपस्थित राहणे. १६) केंद्रप्रमुख व शाळाप्रमुख यांची सादिल, शैक्षणिक उठाव व शाळा सुधार इ. रकमांच्या जमा खर्चाचे हिशेब विहित नियम व अटी यांचे पालन करून केले आहेत की नाही यांची पाहणी करणे. १७) बीटमधील केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक व शिक्षक यांच्या गैरहजेरीबाबत योग्य ती कारवाई करण्याबाबत शिफारस करणे. १८) वरिष्ठ कार्यालयाकडे पाठवावयाचे विविध प्रस्ताव पाहणी करून योग्य त्या शिफारशींसह विहित नमुन्यात आवश्यक त्या कागदपत्रांसह पाठविणे (उदा. नवीन शाळा, नवीन वर्ग उघडणे, भाडेप्रस्ताव, बालवाडी उघडणे इ.) १९) बीट स्तरावरील विविध शैक्षणिक योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे व योजनांचे लाभ पात्र लाभार्थीपर्यंत पोहोचतात किंवा कसे याबाबत किमान ५०% लाभार्थींची पडताळणी करणे. २०) बीटमधील सर्व केंद्रप्रमुख, शिक्षक व मुख्याध्यापक मुख्यालयी राहतात याची खात्री करणे. २१.) पटनोंदणी, उपस्थिती आणि विद्यार्थ्यांची संपादणूक यांबाबतच्या लक्ष्यांच्या पूर्ततेच्या आधारे केंद्रप्रमुखांच्या कामाचे मूल्यमापन करणे. २२.)बीटमधील सर्व केंद्रप्रमुखांच्या कामावर नियंत्रण ठेवणे व केंद्रप्रमुख आपली कर्तव्ये चोखपणे पार पाडतील याबाबत दक्ष राहणे. २३.) वरिष्ठांनी वेळोवेळी सोपविलेली शैक्षणिक कामे वेळच्या वेळी पूर्ण करणे. २४.) आर्थिक बाबींसबंधी शासनाकडून वेळोवेळी निघालेले शासन निर्णय, जिल्हा परिषदेने निर्गमित केलेले आदेश व सूचना आणि लेखा संहितेतील आवश्यक त्या तरतुदी यांचे योग्य ते पालन होईल असे पाहावे. त्या दृष्टीने केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, शाळाप्रमुख यांना मार्गदर्शन करणे. २५.) सर्व शाळांचे जमाखर्च, कॅशबुक, डेडस्टॉक, खतावणी इ. आर्थिक व्यवहारांसंबंधीची रजिस्टर्स विहित नमुन्यात व अद्ययावत ठेवली आहेत याची खात्री करणे. २६.) केंद्रामध्ये शैक्षणिक साहित्य, स्टेशनरी, शैक्षणिक साधने तयार करण्यासाठी लागणारी साधने, शिक्षकांना उपयुक्त ग्रंथसंपदा उपलब्ध करून दिली जाईल हे पाहणे. २७) केंद्र कार्यालय, प्राथमिक शाळा यांची किमान आर्थिक तपासणी करणे. २८) बीट हा घटक मानून विस्तार अधिकारी (शिक्षण) यांनी शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी आपल्या बीटमधील सर्व केंद्रशाळा व घटक शाळांचे शैक्षणिक नियोजन करणे. २९) शाळेत दाखल करावयाच्या मुलामुलींचे सर्वेक्षण केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक व शिक्षकांच्या मदतीने पूर्ण करून घेणे व ५% कुटुंबांची प्रत्यक्ष पडताळणी करणे. ३०) प्राथमिक शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी बीटमधील माध्यमिक शाळांची मदत घेणे. ३१) शाळासमूह योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्यासाठी		

		सहकार्य करणे. ३२) बहिस्थ परीक्षा, स्पर्धा परीक्षा, नैदानिक चाचण्या, किमान अध्ययन क्षमता चाचण्या, सत्र परीक्षा इ बाबत केंद्रप्रमुखांना मार्गदर्शन करणे. ३३) बीटमधील गुणवत्ता विकासाचे विविध उपक्रम परिणामकारकरीत्या राबविणे. ३४) शाळेच्या वार्षिक निकालपत्रकास मान्यता देणे. ३५) निरंतर शिक्षण केंद्र, अनौपचारिक शिक्षण केंद्र यांना भेटी देऊन त्यांचा दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन करणे. ३६) नैतिक शिक्षण, अपंग शिक्षण, वंचितांचे शिक्षण, मतिमंदांचे शिक्षण यांबाबत शासनाच्या विविध योजनांची माहिती घेऊन त्याचा लाभ आपल्या कार्यक्षेत्रातील पात्र मुला-मुलींना मिळेल या दृष्टीने मेळावे, पालकसभा, ग्रामसभा, ग्रामशिक्षण समिती, शाळा व्यवस्थापन समिती इत्यादी सभांमधून माहिती देणे. शासन व समाजाकडून प्राप्त होणाऱ्या पैशाचा शैक्षणिक बाबींसाठी पुरेपूर वापर होईल व अध्ययन प्रक्रिया आनंददायी होईल याकडे जाणीवपूर्वक लक्ष पुरविणे. ३७) मुलींच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरविण्यासाठी मातृप्रबोधन मेळावे, महिला प्रबोधन मेळावे, बचत गट, महिला मंडळाच्या बैठका इ. आयोजित करणे व त्यांना मार्गदर्शन करणे. ३८) पेटमधील सर्व मुले, मुली व शिक्षक यांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने विविध उपक्रम घेऊन वश्यक ते सर्व प्रयत्न करणे. ३९) RTE अंमलबजावणी: 6 ते 14 वर्षे वयोगटातील मुलांच्या प्रवेशाची खात्री करणे, पटनोंदणी व टिकवण वाढवणे आणि मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार कायदा अंतर्गत कर्तव्ये पार पाडणे. ४०) थोडक्यात, शालेय शिक्षण अधिक प्रभावी आणि गुणवत्तापूर्ण बनवणे हे विस्तार अधिकाऱ्याचे मुख्य कर्तव्य आहे		

२५	आरोग्य पर्यवेक्षक	साथरोग नियंत्रण,राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम व जलजन्य आजारांबाबत नियंत्रण, पर्यवेक्षण व अहवाल सादरीकरण (तालुकास्तर).,तालुका स्तरावरील नियंत्रण पथक स्थापन करुन नियंत्रण करणेबाबत.,कार्यक्षेत्रातील पाणी गुणवत्ता तपासणी कार्यक्रमात सहभाग घेवुन जलस्त्रोताचे बाबत नियोजन व वारंवार दुषित आढळणाऱ्या जलस्त्रोताबाबत कार्यवाहीसाठी प्रस्तावित करणे.,ज्या ठिकाणचे पाणी नमुने दुषित आहेत व जी गावे जोखमीची आहेत अशा गावांना भेटी व गटविकास अधिकाऱ्यांमार्फत सुरक्षित पाणी पुरवठयासाठी प्रयत्न करणे.,ग्राम पंचायत अधिकारी यांच्या सभेमध्ये साथपरीस्थितीचा आढावा.,अतिदुर्गम भागातील साथ नियंत्रणातील पर्यवेक्षण, किटकनाशक फवारणी प्रशिक्षण, नियोजन, पर्यवेक्षण, गुणवत्ता, अहवाल, सादरीकरण **कुटंब कल्याण गुणवत्ता पहाणीसाठी** :- अ.कुटुंब नियोजन शिबीरामध्ये सहभाग ब.लसटोचणीसत्रांचे पर्यवेक्षण क.मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिरे यांचे पर्यवेक्षण **जन्म आणि मृत्यु नोंदणी**:-अ) ग्राम पंचायत अधिकारी यांच्या मासिक सभेमध्ये जन्ममृत्यु नोंदणीचा आढावा व अहवाल पाठविण्याची खातरजमा ब) जन्ममृत्यु नोंदणीची पुर्नतपासणी., **आरोग्य शिक्षण**:-यात्रा व महत्वाच्या ठिकाणी चित्रपट, प्रदर्शने, रोगनिदान शिबिरे आयोजित करणे., **समन्वय** :-अ) प्राथमिक आरोग्य केंद्रामधील मासिक सभांना उपस्थित राहून प्राथमिक आरोग्य केंद्र व गटपातळीमधील समन्वयाच्या क्षेत्रांची नोंद करुन अडचणी सोडविणे व समन्वय साधने **ब**) उपकेंद्रांना भेट देऊन पर्यवेक्षण व भेटीमध्ये आढळलेल्या त्रुटीविषयी जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना माहिती क) गटपातळीवरील इतर खात्याचे (बांधकाम राजस्व विभाग इ) कुटुंब नियोजन कार्यक्रमात सहकार्य मिळविणे) **प्रशिक्षण** :- **अ**.ग्राम पंचायत अधिकारी व ग्रामपंचायतीचा कर्मचारी यांचे पाणी शुध्दीकरणाच्या पध्दतीबाबत प्रशिक्षण **ब**) आशा स्वयमसेविकांचे नियमित कामकाजाबद्दल आढावा घेऊन अडचणीबाबत चर्चाकरुन ग्रामपातळीवरील साथ नियंत्रणात आशा स्वयम सेविका यांचा सहभाग वाढविणेबद्दल कार्यवाही करणे. आरोग्य पर्यवेक्षक संवर्गाचे नियुक्ती प्राधिकारी सदर कर्मचाऱ्यांची पदस्थापना त्यांचे कार्यालयात झाल्यास आवश्यकतेप्रमाणे त्यांचे कर्तव्य व जबाबदाऱ्यांमध्ये बदल करु शकतात. तसेच इंतर आरोग्य विषयक कामे, विभागशी संबधीत व स्वच्छ भारत मिशन कक्षाचे कक्ष प्रमुख व विभागाशी संबधीत माहिती बाबत जन माहिती अधिकारी म्हणुन कार्यवाही करणे.	कर्तव्य सुची प्रमाणे	
२६	आरोग्य सेवक पुरुष	१.आरोग्य पर्यवेक्षक यांचेशी सबंधित सर्व कार्यालयीन कामकाज, २.लसीकरण, साथरोग नियंत्रण, कुटुंब कल्याण योजनांची अंमलबजावणी आणि प्राथमिक आरोग्य सेवा घरोघरी पोहोचवणे		
२७.	गट समन्वयक / समुह समन्वयक स्वच्छ भारत मिशन कक्ष	**गट समन्वयक / समुह समन्वयक या पदाच्या भुमिका व जबाबदाऱ्या** 1.महिन्यांतुन किमान १५ दिवस नेमून दिलेल्या गावांना स्थळ भेटी देणे आवश्यक आहे. या भेटी दरम्यान त्यांनी. रात्रीच्या मुक्कामासह गावांमधील सायंकालीन बैठकांना उपस्थित राहणे आवश्यक आहे. 2.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, प्रकल्प संचालक, जल जीवन मिशन व तालुका स्तरावरील अधिकारी जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष यांनी जल जीवन मिशन अंतर्गत वेळोवेळी सोपविलेली कामे करणे. ३. गट संसाधन केंद्राच्या कार्यक्षेत्रातील पाणी व स्वच्छता विषयक प्राथमिक सर्वेक्षण (BASELINE SURVEY) करण्यासाठी ग्राम पंचायती व पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांना सहाय्य करणे.	महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन परीपत्रक क्रमांक संकीर्ण २०२४ दि. ३० एप्रिल २०२४	

